| | | |
|---|---|---|
| आपली सेवा आमचे कर्तव्य —<br>महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्क आयोग | **राज्य लोकसेवा हक्क आयोग,<br>पुणे विभाग, पुणे.**<br>**कार्यालयाचा पत्ता : ३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४** | G20 |
| **दू.क्र.(०२०)-२९९५०६६३** | ई-मेल- **crtspune@maharashtra.gov.in** | |

क्र. आस्था २०२४/रासेहआपु/प्र.क्र.३७२ /कार्या-१/ ७१७ दि. २७.११.२०२४

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत...

महोदय,

राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे या कार्यालयातील विवक्षित कामासाठी शासकीय सेवेतून गट ब (अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले लघुलेखक यांची सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करारपध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्ती करण्याबाबत अर्ज मागविण्याकरीता प्रसिध्द करावयाच्या जाहिरात व अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

तरी सदर जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर तातडीने प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

Mahabharti.in

आपली,

(अनुराधा खानविलकर)
उप सचिव
राज्य सेवा हक्क आयोग,
पुणे महसुली विभाग पुणे

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

Mahabharti.in

**गट ब (अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले लघुलेखक यांच्या सेवा करार तत्वावर घेण्यासाठी अर्ज मागविणेबाबत जाहिरात.**

राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे
३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा. शिवाजीनगर पुणे -४११ ००४

---

राज्य सेवा हक्क आयोग, पुणे कार्यालयामध्ये निम्नलिखित विवक्षित कामकाजासाठी राज्य शासनाच्या सेवेतून गट ब (अराजपत्रित) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेले लघुलेखक यांची सेवा करार पध्दतीने घेण्यासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | अर्हता अनुभव व वय | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | गट ब (अराजपत्रित) संवर्गीय शासनाच्या सेवेमधून सेवानिवृत्त झालेले लघुलेखक | १. अपिल सुनावणीचे श्रुतलेखन घेऊन मराठी भाषेमध्ये आदेश तयार करणे<br>२. मा.आयुक्त यांचे दौरा कार्यक्रम तयार करणे, दौरा दैनंदिनी तयार करणे,<br>३. मा. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यालयप्रमुख, विभागप्रमुख यांच्या बैठकांचे इतिवृत्त तयार करणे<br>४. वार्षिक अहवाल तयार करणे<br>५.कार्यालयांच्या तपासणीचे नियोजन करुन अहवाल तयार करणे | १.महाराष्ट्र शासनाच्या न्यायिक/अर्धन्यायिक प्राधिकरणांमध्ये / शासकीय कार्यालयांमध्ये सुनावणीचे श्रुतलेखन घेऊन मराठी भाषेमध्ये आदेश तयार करणे तसेच दौरा कार्यक्रम, दौरा दैनंदिनी, बैठकांचे इतिवृत्त इ. शासकीय कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त लघुलेखक<br>२.वयोमर्यादा - ५८ ते ६३ वर्षे | १ |

Mahabharti.in

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. वरील कामाकरीता इच्छुक सेवानिवृत्त गट- ब (अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने प्रथमत: १ वर्षाकरीता घेण्यात येईल व आवश्यकतेप्रमाणे सदर कालावधी करारान्वये वाढविण्यात येईल.

२. सेवा कराराच्या अटी व शर्ती तसेच मासिक पारिश्रमिक भत्ते सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ आणि सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००(भाग-१)/१३, दि.०८.०९.२०२३ मध्ये नमूद केल्यानुसार व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणानुसार राहतील.

३. करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही तसेच अर्जित, नैमित्तिक व वैदयकिय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.

४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

५. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

६. उपरोक्त अटी व शर्तीसोबतच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

७. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी **दि.१०.१२.२०२४ रोजी दुपारी ३.००** वाजता सर्व मूळ कागदपत्रांसह (१ संच छायांकित प्रतीसह) खाली नमूद पत्त्यावर आयोगाच्या कार्यालयात मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे. सूचित करण्यात येते की, मुलाखतीसंदर्भात कोणताही वेगळा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयोगाचा राहील.

तरी इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज, शारिरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे (M.B.B.S. डॉक्टरचे) प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह तसेच सेवानिवृत्तीची कागदपत्रे (PPO, सेवानिवृत्ती आदेश, विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नसल्याबाबतचे स्वसाक्षांकीत घोषणापत्र इ.) ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून **दि.०५.१२.२०२४ रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत** खाली नमूद पत्त्यावर समक्ष अथवा टपालाद्वारे पोहोचेल असे सादर करावेत. विहित दिनांक ०५.१२.२०२४ रोजी कार्यालयीन वेळ संपल्यानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जाचा विहित नमुना जाहिरातीसोबत उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

Mahabharti.in

संपर्क :- राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे
३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे
म.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४
दूरध्वनी :- (०२०) – २९९५०६६३
ई-मेल :- **crtspune@maharashtra.gov.in**

(अनुराधा खानविलकर)
उप सचिव
राज्य सेवा हक्क आयोग,
पुणे विभाग, पुणे

# राज्य सेवा हक्क आयोग, पुणे विभाग, पुणे

| गट ब (अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या लघुलेखक यांनी विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज | | पासपोर्ट साईज फोटो |
|---|---|---|
| उमेदवाराचे संपूर्ण नाव | | |
| पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोडसह व ई-मेल | | |
| दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक | | |
| जन्म दिनांक | | |
| सेवानिवृत्तीचा दिनांक व सेवानिवृत्तीच्या वेळेस धारण केलेले पद | | |
| गट | | |
| शैक्षणिक अर्हता, बोर्ड / विदयापीठाचे नाव, उत्तीर्ण वर्ष, टक्केवारी, श्रेणी याबाबतच्या तपशीलासह | | |
| संगणक व इतर अर्हता | | |
| विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नसल्याबाबतचे स्वसाक्षांकीत घोषणापत्र | | |

महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कार्यालयातील कामकाजाचा अनुभव (याबाबत पदनाम, कालावधी,केलेल्या कामाचा स्पष्ट तपशील नमूद करावा)

| अ.क्र. | काम केलेल्या विभागांची नावे | कालावधी | कामाचे स्वरुप/विषय |
|---|---|---|---|
| | | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहिती पैकी कोणतीही माहिती असत्य चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे.

कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत, सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणा अधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशिलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे.

टिप:- अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित व स्वासाक्षांकित प्रति जोडणे आवश्यक आहे.

दिनांक :-

स्थळ :-

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी